# काळ बदलतो आहे

लोकहो तुम्ही जिथे असाल
तिथे सर्व एकत्र या
तुमच्या भोवतीचे पाणी सतत
वाढतेच आहे हे लक्षात घ्या
समजून जा की लवकरच
नसानसा चिंब भिजतील तुमच्या
तुमचा वेळ मौल्यवान वाटत असेल तुम्हाला
तर त्वरित सुरूवात करा पोहायला
नाहीतर बुडून जाल दगडासारखे एखाद्या
... कारण काळ बदलतो आहे

लेखणीतून भाकिते सांगणाऱ्या
साहित्यिकांनो या तुम्हीही
डोळे सजगतेने उघडे ठेवा
अशी संधी पुन्हा येणार नाही
पण व्यक्त होण्याची घाई नको
कालचक्र गतिमान आहे अजूनही
ते कोणाला विजयी घोषित करेल
कदाचित उद्याचा विजेता ठरेल
आजचा पराजित! सांगता येत नाही
... कारण काळ बदलतो आहे

नेत्यांनो, अधिकाऱ्यांनो, जागे व्हा
लक्ष द्या, ऐका काळाची हाक
दरवाजे अडवून, अटकाव करून
प्रवेशाला, नका दाखवू धाक
अडथळे आणेल जो, त्याला
इजा होईल हकनाक
तुंबळ चकमकीचे क्रुद्ध वारे
उग्र होतेय, थडथडतील दारे
आणि भिंतींना तडे जातील लाख
... कारण काळ बदलतो आहे

जगभरच्या मायबापांनो उठा
जागे व्हा सर्व एकसाथ
समजत नाहीत त्या गोष्टींवर
नका टीका करू आणि आकांत
तुमची मुले-मुली आता
नाही राहिली तुमच्या हुकुमात
तुमचे रस्ते आता झाले जुनाट
नवीन मार्गांवर नसेल द्यायचा मदतीचा हात
तर दूर व्हा, नका उभे राहू त्या मार्गात
... कारण काळ बदलतो आहे

संघर्षाची सीमारेखा आखली गेलीय
बदलाचा अभिशाप घेतोय आकार
आज कूर्मगतीने जाणारा
उद्या वेगवान होणार
आजचे नवे असणारे
उद्या पुराणे ठरणार
व्यवस्था सारी जाणार अस्तास
आज आघाडीवर असेल त्यास
उद्या पिछाडीस जावे लागणार
... कारण काळ बदलतो आहे

The Times They Are A-Changin' by Bob Dylan
Translation by Abhay B. Joshi and Milind A. Toro